MHYA010016772024

दाखल तारीख : ०६/०८/२०२४
नोंदणी तारीख : २०/०८/२०२४
निकाल तारीख : १६/०४/२०२६
कालावधी : वर्ष महीने दिवस
०१ ०८ १०

## भाग - अ

**[ परिच्छेद क्र.४४(१), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]**

**अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी : पी.एस.इंगळे )

**सत्र खटला क्रमांक - ८८/२०२४** **निशाणी क्रमांक - ४६**

| | |
|---|---|
| **न्यायनिर्णय दिनांक : १६/०४/२०२६** | |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकार तर्फे,**<br>पोलीस स्टेशन यवतमाळ ग्रामीण,<br>जि. यवतमाळ. |
| **फिर्यादी पक्षातर्फे अभियोक्ता** | श्री. एन. एन. पांडे |
| **- विरूद्ध -** | |
| **आरोपी** | १. किशोर लक्ष्मण इंगळे,<br>वय – ४७ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. बोरी गोसावी, ता. जि. यवतमाळ.<br><br>२. गजानन रामकृष्ण पाटील,<br>वय – ४८ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. सालोड, पो. स्टे वडगाव जंगल, ता. जि. यवतमाळ.<br><br>३. अशोक वासुदेव पुरी,<br>वय – ५७ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. ग्राम किन्ही, ह. मु. दर्डा नगर, ता. जि. यवतमाळ.<br><br>४. सुजर गंगाराम खोब्रागडे,<br>वय – ३५ वर्षे, धंदा – शेती,<br>रा. बोधगव्हाण, ता. जि. यवतमाळ. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ** | ॲड. श्री. पि. पि. किर्दक |

## <u>भाग -ब</u>

## [ परिच्छेद क्र.४४(२), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक | ३०/१०/२०२३ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ३०/१०/२०२३ |
| फिर्याद/दोषारोपपत्र दिनांक | २७/०२/२०२४ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०६/०१/२०२५ |
| दोषारोप पुर्वीच्या पुरावा दिनांक | निरंक |
| न्यायानिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | १६/०४/२०२६ |
| शिक्षा पारित केल्याचा दिनांक, जर असेल तर | ..... |

## <u>आरोपीचा तपशील</u>

| अ.क्र | आरोपींचे नांव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा / आरोप | दोषी किंवा निर्दोष | शिक्षा | आरोपींचा बंदी असलेला कालावधी फौ.प्र.सं.क. ४२८नुसार सुट देणेकरीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | किशोर लक्ष्मण इंगळे, | अटकपूर्व जामीन | १८/७/२४ | भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५३ व १८६ सह कलम ३४ प्रमाणे होणारे अपराध. | आरोपींना दोषमुक्त करण्यात आले. | निरंक | निरंक |
| २. | गजानन रामकृष्ण पाटील, | -"- | १८/७/२४ | -"- | -"- | -"- | -"- |
| ३. | अशोक वासुदेव पुरी, | -"- | २९/७/२४ | -"- | -"- | -"- | -"- |
| ४. | सुजर गंगाराम खोब्रागडे, | -"- | १८/७/२४ | -"- | -"- | -"- | -"- |

**<u>न्यायनिर्णय</u>**

**(दिनांक १६/०४/२०२६ रोजी घोषित)**

या प्रकरणामध्ये आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५३ व १८६ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधाबाबतचा खटला चालविण्यात आला.

२. फिर्यादीचे प्रकरण थोडक्यात असे की घटना दिनांक ३०/१०/२०२३ रोजी दुपारी ४.१५ वाजताच्या सुमारास मौजा किन्ही येथील शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या सभा मंडपामध्ये घडली. तक्रारकर्ते संदिप दादाराव मेहत्रे हे पोलीस हवालदार असून ते पोलीस स्टेशन, यवतमाळ ग्रामीणचे ठाणेदार यांचे लेखनिक म्हणून कामकाज पाहात होते. घटनेच्या दिवशी मौजा किन्ही येथे शासन आपले दारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य हे हजर राहणार असल्याने व फार मोठ्या प्रमाणात गर्दी राहणार असल्याने पोलीस अधीक्षकांच्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांची सभास्थळी गर्दीवर देखरेख करण्याकरीता ड्यूटी लावण्यात आली होती. तक्रारकर्ते संदिप दादाराव मेहत्रे यांची सुध्दा पोलीस निरीक्षकांसोबत बंदोबस्त ड्यूटी लागली असल्याने कार्यक्रम स्थळी ड्युटी कामी हजर राहून ते कर्तव्य बजावत होते. कार्यक्रम सुरु असतांना अंदाजे १६.१५ वाजताच्या सुमारास कार्यक्रम स्थळाच्या स्टेजच्या समोरील बाजूला असलेल्या सभामंडपाचे शेवटच्या भागात चार इसमांनी उभे राहून जोरजोराने ओरडून नारेबाजी करुन कार्यक्रमात गोंधळ घालायला सुरुवात केली. त्यामुळे, गर्दी नियंत्रण व देखरेख कामी बंदोबस्तात नेमलेल्या स्थानिक गुन्हे शाखा येथील साध्या पोशाखातील अधिकारी व अंमलदार यांच्या मदतीने सदर इसमांना सभामंडपामधून ताब्यात घेवून त्यांना सभामंडपाच्या बाहेर काढत असतांना सर्वांनी संगनमत करुन कर्तव्य बजावत असतांना, <u>त्यांच्या व इतर पोलीसांचे अंगावर येवून</u> *"तुम्ही आम्हाला अडवणारे कोण आहेत, आम्हाला सोडून द्या, नाहीतर तुम्हाला पाहून घेवू",* अशी धमकी त्यांना व साध्या

पोशाखातील पोलीसांना देवून धक्काबुक्की केली. सबब, त्या व्यक्तींनी वरील प्रमाणे फौजदारीपात्र बलप्रयोग करुन हल्ला केला. सदर चारही इसमांना सभामंडपा पासून सुरक्षीत स्थळी नेवून त्यांना नाव–गाव विचारले असता, त्यांनी त्यांची नावे किशोर लक्ष्मण इंगळे, गजानन रामकृष्ण पाटील, अशोक वासुदेव पुरी व सुरज गंगाराम खोब्रागडे असे सांगीतले. कार्यक्रम सुरु असल्याने त्यांना सुरक्षीत स्थळी नेवून स्थानबध्द करण्यात आले. मौजा किन्ही येथे उपरोक्त कार्यक्रम सुरु असल्याने व कार्यक्रम स्थळी फार मोठ्या प्रमाणात जन समुदाय उपस्थीत असल्याने शांततेने बंदोबस्त पार पाडणे आवश्यक असल्याने तसेच रात्री उशीरापर्यंत बंदोबस्त असल्याने व पोलीस स्टेशन हद्दीत मराठा आंदोलना संबंधी बंदोबस्तात व्यस्त असल्याने, सर्व बंदोबस्त पार पाडून पोलीस स्टेशनला हजर येवून तक्रारकर्ते संदिप दादाराव मेहत्रे त्यांनी आरोपींच्या विरोधात कैफियत दिली. कैफीयत प्राप्त झाल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला तसेच साक्षीदारांची बयाने नोंदविली. तपासाअंती, पोलीसांनी आरोपींच्या विरोधात दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

३. माझ्या विद्वान पूर्वाधिका-यांनी आरोपींच्या विरोधात भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५३ व १८६ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधांचे आरोप निश्चीत केले व ते आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आले. मात्र, आरोपींनी ते कबूल नसल्याचे सांगून आरोपींनी खटला चालविण्याची विनंती केली.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे नोंदविण्यात आलेल्या आरोपींच्या बयाणावरून, आरोपींचा बचाव असा आहे की ते विरोधी पक्षाचे कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्या विरोधात खोटे प्रकरण दाखल करण्यात आले व खोटा पुरावा देण्यात आला.

५. फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. एन. पांडे व आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. पि. पि. किर्दक यांचा युक्तीवाद ऐकला तसेच प्रकरणाचे

अवलोकन केले. फिर्यादीतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. एन. पांडे यांनी फिर्यादीच्या प्रकरणाप्रमाणे युक्तीवाद केला. उलटपक्षी, आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. पि. पि. किर्दक यांनी असा युक्तीवाद केला की फिर्यादीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांचा पुरावा शंका निर्माण करणारा असून विश्वासार्ह नाही व त्यामुळे आरोपींना दोषमुक्त करण्यात यावे.

६. प्रकरणाचे अवलोकन केले व दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ आले व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालील प्रमाणे आहेतः-

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादीने असे सिध्द केले काय की दिनांक ३०/१०/२०२३ रोजी दुपारी ४.१५ वाजताच्या सुमारास मौजा किन्ही येथील शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या सभा मंडपामध्ये आरोपींनी, त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने, तक्रारकर्ते संदिप दादाराव मेहत्रे तसेच इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी हे लोकसेवक म्हणून आपले कर्तव्य बजावत असतांना त्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने, धक्काबुक्की करुन त्यांच्यावर हल्ला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केला व त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम ३५३ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| २. | फिर्यादीने पुढे असे सिध्द केले काय की उपरोक्त दिवशी, वेळी व स्थळी, आरोपींनी, त्यांचा समान उद्देश साध्य करण्याच्या दृष्टीने, लोकसेवकांना म्हणजे तक्रारकर्ते संदिप दादाराव मेहत्रे यांना तसेच इतर पोलीस अधिका–यांना व कर्मचा–यांना त्यांचे सार्वजनिक कार्य पार पाडण्यापासून स्वेच्छेने अडथळा आणला व त्याव्दारे आरोपींनी भारतीय दंड संहीता, १८६० चे कलम १८६ प्रमाणे होणारा अपराध केला ? | ... नाही |
| ३. | काय आदेश ? | आरोपींना दोषमुक्त करण्यात आले. |

७. आरोपींच्या विरोधात उपरोक्त अपराधांचे घटक सिध्द करण्याकरीता फिर्यादीतर्फे खालील साक्षीदार तपासण्यात आले :-

| | |
|---|---|
| (अ) | संदिप दादाराव मेहत्रे (फि.सा.क्र.१), जे तक्रारकर्ते व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. |
| (ब) | किशोर मनोहर झेंडेकर (फि.सा.क्र.२), जे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. |
| (क) | गणेश कृष्णा वनारे (फि.सा.क्र.३), जे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. |
| (ड) | संजय अंबादास गिरी (फि.सा.क्र.४), जे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहेत. |
| (इ) | भिवराज लालोजी घोगरे (फि.सा.क्र.५), जे घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहेत. |
| (ई) | प्रकाश कवडूजी तुनकलवार (फि.सा.क्र.६), जे तपासी अधिकारी आहेत. |

## -: **<u>निष्कर्षांची कारणे</u>** :-

**<u>मुद्दा क्रमांक १ व २ च्या बाबत</u>** :–

८. मुद्दा क्रमांक १ व २ हे एकमेकांशी संबंधीत असल्याने तसेच या प्रकरणातील विशिष्ट परिस्थितीचा विचार करता आणि पुनरावृत्ती टाळण्याकरिता, या दोन्ही मुद्यांवर मी एकत्रीतपणे चर्चा करीत आहे.

९. संदीप मेहेत्रे (फि.सा.क्र.१) हे पोलीस कॉन्स्टेबल तसेच तक्रारकर्ते असून त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की आरोपींनी त्यांना व इतर पोलीसांना धक्काबुक्की करून अशी धमकी दिली की, *"आम्हाला अडवणारे कोण आहेत आम्हाला सोडून द्या नाहीतर तुम्हाला पाहून घेऊ"*.

१०. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार पोलीस कॉन्स्टेबल किशोर झेंडेकर (फि.सा.क्र.२) आणि पोलीस उपनिरीक्षक गणेश वनारे (फि.सा.क्र.३) यांनी सुद्धा संदीप (फि.सा.क्र.१) यांच्या पुराव्या सारखाच पुरावा दिला. थोडक्यात, आरोपींनी कथित घटनेच्या वेळी वर उल्लेखित एकसारखीच वाक्ये त्यांना म्हटल्याचे, उपरोक्त सर्व पोलीस साक्षीदारांनी त्यांच्या पुरावा दरम्यान त्यांनी सांगितले. मात्र, एकाच वेळी चारही आरोपींनी एकच वाक्य एकाच वेळेस उच्चारणे, हे नैसर्गिक व विश्वासार्ह वाटत नाही व त्यामुळे उपरोक्त सर्व पोलीस

साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करतो.

११. याशिवाय, या प्रकरणांमध्ये तक्रारकर्ते संदीप (फि.सा.क्र.१) हे पोलीस हवालदार असतांना सुद्धा त्यांनी कथित घटनेची कैफियत पोलीस स्टेशनला देण्यास अंदाजे एक दिवसाचा विलंब केलेला आहे.

१२. याबाबत, मी कैफियत तसेच प्रथम खबर अहवाल (F.I.R.) चे अवलोकन करीत आहे. घटना दिनांक ३०.१०.२०२३ रोजी १६.१५ वाजता घडल्याचे कैफियत (निशाणी क्रमांक १५) मध्ये नमूद आहे. मात्र, पोलीस कॉन्स्टेबल संदीप (फि.सा.क्र.१) यांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक ३१.१०.२०२३ रोजी पोलीस स्टेशनमध्ये कैफियत/तक्रार दिली व त्यांच्या कैफियतीवरून प्रथम खबर अहवाल (F.I.R.) दुसऱ्या दिवशी अंदाजे २४ तासांच्या जवळपास १६.१३ वाजता पोलीसांनी नोंदविला. थोडक्यात, तक्रार देण्यास जवळपास एक दिवसाचा विलंब पोलीस कॉन्स्टेबल संदीप (फि.सा.क्र.१) यांनी केला. घटनास्थळावरील कार्यक्रम उशिरापर्यंत चालू असल्यामुळे व इतर बंदोबस्त असल्यामुळे पोलीस कॉन्स्टेबल संदीप (फि.सा.क्र.१) यांनी कैफियत देण्यास विलंब केल्याचे स्पष्टीकरण कैफियतीमध्ये नमूद केलेले आहे. मात्र, प्रथम खबर अहवाल (निशाणी क्रमांक १६) मधील परिच्छेद क्रमांक ५ मध्ये घटनास्थळ व पोलीस स्टेशन मधील अंतर फक्त सहा किलोमीटर असल्याचे नमूद आहे. पोलीस कॉन्स्टेबल असलेले संदीप (फि.सा.क्र.१) यांना फोन द्वारे किंवा वायरलेस यंत्रणेद्वारे किंवा प्रत्यक्ष पोलीस स्टेशनमध्ये जाऊन कथित घटनेच्याच दिवशी पोलीस स्टेशनमध्ये जाऊन घटनेबाबतची माहिती किंवा कैफियत पोलीस स्टेशनला देऊन गुन्हा नोंदविता आला असता. मात्र, त्यांनी तसे केले नाही. थोडक्यात, संदीप (फि.सा.क्र.१) हे पोलीस हवालदार असताना सुद्धा त्यांनी पोलीस स्टेशनला कैफियत देण्यास झालेल्या विलंबाचे त्यांनी दिलेले उपरोक्त स्पष्टीकरण समाधानकारक वाटत नाही. सबब, प्रथम खबर अहवाल/कैफियत देण्यास झालेला विलंब फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणारा आहे.

१३. तसेच या प्रकरणामधील साक्षीदार पोलीस उपनिरीक्षक गणेश (फि.सा.क्र.३) यांनी असे सांगितले की सभा मंडपामध्ये मोठ्या टी.व्ही. स्क्रीन होत्या व त्यामध्ये भाषणे दिसत होती, तसेच गोपनीय पोलीसांचा व्हिडिओ कॅमेरा सभा मंडपामध्ये चित्रीकरण करीत होता. त्यांच्या या पुराव्याद्वारे असे स्पष्ट होते की तपास अधिकाऱ्यांना ते व्हिडिओ चित्रीकरण प्रकरणामध्ये दाखल करून आरोपींच्या विरोधात गुन्हा सिद्ध करता आला असता. मात्र तपास अधिकारी प्रकाश तनकुलवार (फि.सा.क्र.६) यांनी तसे केले नाही. यावरून असे स्पष्ट होते की कथित घटना व्हिडिओ स्वरूपात उपलब्ध होती. तथापी, तपास अधिकारी प्रकाश (फि.सा.क्र.६) यांनी संबंधित व्हिडिओ चित्रीकरण जप्त केले नाही तसेच ते न्यायालयात सुद्धा सादर केले नाही किंवा त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण दिले नाही. ही बाब महत्वाची असून फिर्यादीच्या प्रकरणाबाबत गंभीर शंका उपस्थित करणारी आहे. थोडक्यात, उपलब्ध असलेला सर्वोत्तम पुरावा (best evidence) सादर न करणे, ही बाब फिर्यादीच्या प्रकरणाच्या विरोधात जाते व त्यामुळे आरोपींना कथित गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याबाबत शंका निर्माण होते.

१४. याशिवाय, गोपनीय पोलीस चित्रीकरण करत असल्याचे गणेश (फि.सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान सांगितले. थोडक्यात, पोलीसच चित्रीकरण करीत असल्यामुळे त्यांच्याकडे त्याबाबतचा इलेक्ट्रॉनिक पुरावा सहज उपलब्ध असताना सुद्धा त्यांनी तो या प्रकरणामध्ये सादर न केल्यामुळे, या प्रकरणाबाबत प्रतीकुल अनुमान काढण्यास सबळ आधार आहे. सबब, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता, असे स्पष्ट होते की आरोपींच्या विरोधात असलेल्या अपराधांचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केले नाही.

१५. तपास अधिकारी प्रकाश (फि.सा.क्र.६) यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे सांगितलेले आहे की त्यांनी घटनेचा तपास केला तसेच घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केला. मात्र, घटनास्थळ पंचनामा पंचांसमक्ष तयार केल्याबाबतचा प्रकाश

(फि.सा.क्र.६), यांनी दिलेला पुरावा पुष्टी विरहित आहे, कारण घटनास्थळ पंचनाम्यावरील दोन्ही पंच संजय (फि.सा.क्र.४) आणि भिवराज (फि.सा.क्र.५) यांनी फिर्यादीच्या प्रकरणास अनुसरून पुरावा दिलेला नाही. संजय (फि.सा.क्र.४) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे सांगितले की त्यांना पंचनाम्यातील मजकूर माहिती नाही. तसेच भिवराज (फि.सा.क्र.५) यांनी त्यांच्या पुरावा दरम्यान असे सांगितले की ते जेव्हा पोलीस स्टेशनला गेले होते तेव्हाच पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा अगोदरच तयार केला होता आणि घटनास्थळ पंचनामा कोठे तयार करण्यात आला होता, हे त्यांना माहीत नाही. सबब, प्रकाश (फि.सा.क्र.६) यांनी घटनास्थळावर पंचनामा तयार केल्या बाबतचा पुरावा पुष्टी विरहित असल्यामुळे विश्वासार्ह नाही.

१६. याशिवाय, घटनास्थळावर अंदाजे ५० ते ६० हजार व्यक्ती उपस्थित असल्याचे संदिप (फि.सा.क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान सांगितले. तसेच, गणेश (फि.सा.क्र.३) यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान असे कबूल केली की घटनास्थळावर अंदाजे ४० ते ५० हजार व्यक्ती उपस्थित होत्या. थोडक्यात, घटनास्थळी मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय उपस्थित असतांनाही स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात आलेले नाहीत. ही बाब सुध्दा, फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणारी आहे.

१७. थोडक्यात, प्रथम खबर अहवालामधील विलंब, व्हिडिओ चित्रीकरण उपलब्ध असूनही ते न्यायालयात सादर न करणे, स्वतंत्र साक्षीदारांचा अभाव तसेच पंचनामा तयार करण्याबाबतची शंका, या सर्व बाबी फिर्यादीच्या प्रकरणाबाबत शंका निर्माण करणाऱ्या असून त्यामुळे फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असलेल्या अपराधांचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिद्ध केलेले नाही.

१८. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी पुरसिस (निशाणी क्रमांक ३७) दाखल करुन त्याव्दारे फिर्यादीच्या पुराव्याची बाजू बंद केली. उपरोक्त सर्व बाबींचा तसेच प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा एकत्रीत परिणाम (cumulative effect) असा आहे की

फिर्यादीने आरोपींच्या विरोधात असणा-या सर्व आरोपांचे आवश्यक घटक, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर नकारार्थी दिलेले आहे.

**मुद्दा क्रमांक ३ च्या बाबत** :—

१९. प्रकरणात उपलब्ध पुराव्याचा विचार करता, मी अगोदरच असे ठरविले आहे की फिर्यादीने आरोपीच्या विरोधात असलेले आरोप, माफक संशयापलीकडे, सिध्द केलेले नाहीत. सबब, मी आरोपीला संशयाचा फायदा देत आहे. म्हणून आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः, मुद्दा क्र. ३ चे उत्तरार्थ, मी खालील आदेश पारीत करीत आहे :-

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपींना भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३५३ व १८६ सह वाचित कलम ३४ प्रमाणे होणा-या अपराधांच्या आरोपातून, फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २३५(१) अन्वये, दोषमुक्त करण्यात आले. |
| २. | आरोपींची जामीन बंधपत्रे रद्द करण्यात यावी. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ प्रमाणे पुर्तता करावी. |

दिनांक - १६/०४/२०२६

PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Digitally signed by PREMTUSHAR SAMADHANRAO INGLE
Date: 2026.04.16 16:51:08 +0530

(पी. एस. इंगळे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.

## भाग -क

## [ परिच्छेद क्र.४४(३), प्रकरण ६, फौजदारी नियम पुस्तिका ]

## अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| फि.सा.क्र.१ | संदिप दादाराव मेहत्रे (नि.क्र.१४) | तक्रारकर्ते व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि.सा.क्र.२ | किशोर मनोहर झेंडेकर (नि.क्र.१८) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.३ | गणेश कृष्णा वनारे (नि.क्र.१९) | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| फि. सा.क्र.४ | संजय अंबादास गिरी (नि.क्र.२०) | घटनास्थळ पंच |
| फि. सा.क्र५. | भिवराज लालोजी घोगरे (नि.क्र.२५) | घटनास्थळ पंच |
| फि. सा.क्र.६ | प्रकाश कवडूजी तुनकलवार (नि.क्र.२७) | तपासी अधिकारी |

**ब. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार. जर असेल तर :**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे / साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | निरंक | निरंक |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष /न्यायालयामार्फत दस्तऐवजास देण्यात आलेल्या निशाणी

**अ. अभियोग पक्ष :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १५ | कैफियत |
| २. | १६ | प्रथम खबर अहवाल |
| ३. | २१ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २६ | पंच नियुक्ती पत्र |
| ५. | २८ व २९ | ग्राम पंचायत किन्ही यांना दिलेले पत्र |

| | | |
|---|---|---|
| ६. | ३० | पंच पुरविल्याबाबतचे पत्र |
| ७. | ३१ | बंदोबस्ताबाबत आदेशाची प्रत मागीतल्याचे पत्र |
| ८. | ३२ ते ३५ | अटक फॉर्म |
| ९. | ३६ | स्टेशन डायरीचा उतारा |

**ब. बचाव पक्ष :**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. न्यायालयामार्फत देण्यात आलेल्या निशाणी :**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुददेमाल :**

| **अनुक्रमांक** | **मुददेमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Ad-hoc District Judge-1, Yavatmal |
| Date of Signature of Presiding Officer | 16/04/2026 |
| Date of Judgment Uploaded | 16/04/2026 |

DIPALI SOMESHWAR KOLHE

Digitally signed by DIPALI SOMESHWAR KOLHE
Date: 2026.04.16 16:53:02 +0530

दिनांक - १६/०४/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी-१, यवतमाळ.
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१, यवतमाळ.